M. S. Board Of Secondary
And Higher Secondary
Education,Mumbai
Divisional Board,Vashi, Navi
Mumbai-४०० ७०३.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.

क्र. मुंविमं/यो.प्र./३८८६
वाशी,नवी मुंबई ४००७०३
दिनांक:२४/०८ /२०२६

प्रति,

मुख्याध्यापक /प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये,
ठाणे/रायगड/पालघर/मुंबई(दक्षिण/उत्तर/पश्चिम)

**विषय- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ योग्यता प्रमाणपत्राबाबत सूचना**
**संदर्भ -१) क्र.रा.मं./संशोधन/३३३७, दिनांक २३/०८/२०२४**
**२) क्र.रा.मं./संशोधन/२९५, दिनांक २३/०१/२०२५**
**३) क्र.रा.मं./संशोधन/३३८६, दिनांक ०३ /१०/२०२५**

मुंबई विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यता प्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात येते की, मंडळ अधिनियम १९६५ नुसार व विनियम १९७७ मधील नियम क्र. ८० (१) अन्वये या मंडळाव्यतिरिक्त इतर संविधानिक मंडळे, मान्यता प्राप्त संस्था व विद्यापीठे यांच्या परीक्षा उतीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना इ.११ वी/ इ.१२ वी प्रवेशासाठी योग्यता प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. योग्यता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याबाबतच्या सूचना व कार्यपद्धती खालीलप्रमाणे आहेत.

**अ) योग्यता प्रमाणपत्रासाठी पात्रतेच्या अटी :-**

१. राज्य मंडळाने निर्देशित केलेल्या बोर्डाशी समकक्ष असलेल्या बोर्डामधून विदयार्थी इ.१० वी उत्तीर्ण असावा. समकक्ष बोर्डाची यादी मंडळाच्या mahahsscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

२. विद्यार्थी इ. १० वी/ इ.११ वी परीक्षा इंग्रजी विषयासह पाच विषयामध्ये उत्तीर्ण असावा.

३. इ. ११ वी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला असल्यास विज्ञान विषयात संबंधित मंडळाच्या निकषानुसार विदयार्थी विज्ञान विषयात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**ब) योग्यता प्रमाणपत्र अर्ज भरण्याची कार्यवाही :-**

१. परराज्यातील / परदेशातील विद्यार्थी ज्यावेळी इ. 11 वी मध्ये मान्यता प्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतात, त्यावेळी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांनी योग्यता प्रमाणपत्र अर्ज मंडळाने निर्देशित केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन प्राणलीमार्फतच भरण्यात यावेत. (CBSE/ICSE या मंडळातून उत्तीर्ण झालेले विदयार्थी सोडून) योग्यता प्रमाणपत्र अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे ऑनलाईन पद्धतीने अपलोड करणे आवश्यक आहे.

२) उत्तीर्ण परीक्षेची गुणपत्रिका, प्रमाणपत्र, शाळा सोडल्याच्या दाखल्याची छायांकित प्रत स्वसाक्षांकित केलेली असावी.

३) मूळ प्रमाणपत्र संबंधित मंडळाकडून प्राप्त झालेले नसल्यास मूळ तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) व त्याची प्रमाणित्रत छायांकित प्रत

४) मूळ स्थलांतर प्रमाणपत्र ( Original Migration Certificate )

५) परदेशी विद्यार्थ्यांनी वरील अ. क्र, १ ते ३ या कागदपत्रासह अर्जासोबत आलेले "Appenddix A" वर सबंधीत शाळेचा सही शिक्का तसेच भारतीय राजदूतावास(Indian Embassy) यांचा सही शिक्का असणे आवश्यक आहे.

**क) CBSE व ICSE बोर्डातून उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्राकरीता सूचना :**

शैक्षणिक वर्ष सन 2026-27 पासुन CBSE व ICSE बोर्डाच्या विद्यार्थ्यांना योग्यता प्रमाणपत्र संदर्भात कनिष्ठ महाविद्यालयाने पुढील कार्यवाही करावी.

१ . CBSE व ICSE बोर्डातून उत्तीर्ण होऊन येणाऱ्या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्रासाठी कोणतेही (ऑनलाईन/ऑफलाईन) आवेदनपत्र भरण्यात येवू नये.CBSE / ICSE बोर्डातुन माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व या मंडळामार्फत इ.11 वी आणि इ.12 वी नियमित तसेच खाजगी विद्यार्थी योजने अंतर्गत इ. 12 वी मध्ये प्रविष्ठ होणाऱ्या / प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणित याद्या व इ. 10 वी च्या गुणपत्रकाची प्रमाणित छायांकित प्रत परिपत्रकामध्ये दिलेल्या विहित तक्त्यात कार्यालयात समक्ष येवून जमा करण्यात यावे. त्याचप्रमाणे प्रती विद्यार्थी निर्धारित शुल्क QR Code / UPI द्वारे प्रत्यक्ष मंडळात येवून भरणा करण्यात यावे. प्रस्ताव सादर करताना **इ.११ वी चे स्वतंत्र , इ. १२ वी चे स्वतंत्र व खाजगी विद्यार्थ्यांचे स्वतंत्र प्रस्ताव जमा करण्यात यावे.**

२. **CBSE / ICSE बोर्डातून उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र देण्यात येणार नसल्याने संबंधित विद्यार्थ्यांकडून परीक्षेची आवेदनपत्र भरतांना योग्यता प्रमाणपत्राच्या क्रमांकाची आवश्यकता भासणार नाही त्यामुळे त्याची विद्यार्थ्याकडून मागणी करु नये. परीक्षेची आवेदनपत्र भरतांना प्रमाणपत्र क्रमांका ऐवजी CBSE / ICSE बोर्ड याचा उल्लेख करण्यात यावा.**

**फक्त CBSE व ICSE बोर्ड विद्यार्थ्यांसाठीच्या यादीचा तक्ता नमुना :**

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव (इंग्रजीमध्ये) | इ. 11 वी किंवा इ. 12 वी प्रवेशाचे वर्ष | इ. 10 वी /इ.11 वी उत्तीर्ण झालेल्या मंडळाचे नाव | गुणपत्रिकेची छायांकित प्रत जोडली आहे / नाही | भरण्यात आलेले शुल्क |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

**ड) योग्यता प्रमाणपत्र अर्ज कनिष्ठ महाविद्यालयानी सादर करण्याबाबतच्या तारखा व शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे**

| अनु. क्र. | विवरण | योग्यता प्रमाणपत्र सादर करण्याच्या तारखा |
|---|---|---|
| १ | योग्यता प्रमाणपत्राचे नियमित शुल्क<br>(भारतीय विद्यार्थी) रु.१०००/-<br>(परदेशी विद्यार्थी) रु.१५००/- | दिनांक ०१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर पर्यंत |
| २ | योग्यता प्रमाणपत्राचे विलंब शुल्क<br>(भारतीय विद्यार्थी) रु.१०००+१००/- = ११००/-<br>(परदेशी विद्यार्थी) रु.१५००+ १००/- = १६००/- | दिनांक ०१ ऑक्टोबर ३० नोव्हेंबर पर्यंत |
| ३ | योग्यता प्रमाणपत्राचे अतिविलंब शुल्क<br>(भारतीय विद्यार्थी) रु.१०००+१००+२०/- प्रति दिन प्रती विद्यार्थी<br>(परदेशी विद्यार्थी) रु.१५००+ १००+२०/- प्रति दिन प्रती विद्यार्थी | दिनांक ०१ डिसेंबर पासुन ते योग्यता प्रमाणपत्र विभागीय मंडळात सादर करण्यात आलेल्या दिनांकापर्यंत |

इ १२ वी च्या योग्यता प्रमाणपत्र अर्जाच्या त्रुटी पूर्तता करण्यासाठी निकालानंतर दि.३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत अंतिम मुदत राहिल.योग्यता त्रुटी पूर्तता न झाल्यास सदर विद्यार्थ्याची परीक्षेची संपादणूक रद करण्यात येईल यांची नोंद गांभीर्याने घ्यावी. तसेच सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास संपूर्ण जबाबदारी ही कनिष्ठ महाविद्यालयच्या प्रमुखांची राहील.

**इ) सैनिकी शाळा / कनिष्ठ महाविद्यालये, शासकीय आश्रमशाळा यांचेकरीता सूचना :**

१ . CBSE / ICSE बोर्डातून माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व या मंडळामार्फत इ.11 वी आणि इ.12 वी नियमित तसेच खाजगी विद्यार्थी योजने अंतर्गत इ. 12 वी मध्ये प्रविष्ठ होणाऱ्या / प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणित यादया व इ.10 वी गुणपत्रकाची प्रमाणित छायांकित प्रत उपरोक्त दिलेल्या विहित तक्त्यात कार्यालयात समक्ष येवून देण्यात याव्यात. त्याचप्रमाणे प्रती विद्यार्थी निर्धारित शुल्क QR Code / UPI द्वारे प्रत्यक्ष मंडळात येवून भरणा करण्यात यावे. तसेच CBSE / ICSE बोर्ड वगळून इतर सविधानिक मंडळे, मान्यता प्राप्त संस्था व विद्यापीठातून परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज ऑनलाईन पोर्टलद्वारे करण्यात यावे.

**ई) योग्यता प्रमाणपत्र अर्ज सादर करतांना कनिष्ठ महाविद्यालयानी खालील सुचनांचे काटेकोरपणे पालनकरणे बंधनकारक आहे.**

१. विभागीय शिक्षण उपसंचालकांनी इ. ११ वीसाठी ऑनलाईन प्रवेश दिल्यानंतर संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांनी संबंधित विद्यार्थी अटी
अ) अधिकृत बोर्डाची इ. १० वी परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे काय ?
ब) इंग्रजी विषयासह पाच विषयात उत्तीर्ण आहे काय?
क) इ. ११ वी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला असल्यास विज्ञान विषयात संबंधित मंडळाच्या नुसार विद्यार्थी विज्ञान विषयात उत्तीर्ण आहे काय?
ड) विज्ञान असा ठळक विषय नसला तरी त्याने घेतलेल्या विषयात विज्ञान शाखेच्या / विषयाच्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र या विषयांचा अभ्यासक्रम असलेला विषय असावा. या चारही बाबींचा संबंधित विद्यार्थ्याच्या कागदपत्रावरून पडताळणी करूनच प्रवेश देण्यात यावा अन्यथा प्रवेश देण्यात येऊ नये.

२. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अंतर्गत येणा-या विभागीय मंडळासाठी ए.टी.के.टी. चा नियम लागू आहे. परंतु इतर बोर्डातील विद्यार्थ्यांना ए.टी.के.टी. चा नियम लागू नाही, याची नोंद घ्यावी.

३. काही बोर्डाच्या गुणपत्रिका व प्रमाणपत्र एकच असतात त्याप्रमाणे त्यावर नमूद केलेले असते. ज्या बोर्डाची गुणपत्रिका स्वतंत्र देण्यात येते त्या बोर्डाचे प्रमाणपत्र अथवा तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Passing Certificate) सादर करणे आवश्यक आहे.

४. वरील अटी व शर्तींची पुर्तता केलेल्या विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयात तात्पुरता प्रवेश द्यावा. त्यानंतर मंडळाने निर्धारित केलेल्या तारखेस विद्यार्थ्यांचा योग्यता प्रमाणपत्राचा अर्ज मंडळाकडे सादर करावा.

५. योग्यता प्रमाणपत्राशी संबंधित माहिती अथवा इतर बाबींसाठी कनिष्ठ महाविद्यालयाचा जबाबदार प्रतिनिधी मंडळात पाठविण्यात यावा. विद्यार्थी / पालक यांना मंडळामध्ये पाठवू नये.

६. ज्या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज मंडळास सादर करून योग्यता प्रमाणपत्र घेतलेले नाही अशा विद्यार्थ्यांचा इ. 11 वी चा निकाल कनिष्ठ महाविद्यालयाने राखून ठेवावा. योग्यता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय विद्यार्थ्यास इ.12 वी मध्ये प्रवेश देण्यात येवू नये.

७. ज्या संस्थेचे नाव मंडळाच्या समकक्षता यादीमध्ये नाही किंवा सदर संस्थेस समकक्षता दिलेली नाही अशा संस्थेचे परिपूर्ण प्रस्ताव संबंधित कनिष्ठ
महाविद्यालयाकडून विभागीय मंडळास परिपुर्ण प्रस्ताव शैक्षणिक वर्षामध्ये इ. 12 वी साठी 31 ऑगस्ट पूर्वी व इ. 11 वी साठी दि. 30 नोव्हेंबर पूर्वी या मंडळाकडे सादर करणे अनिवार्य आहे.

८. ज्या मंडळाच्या नियमित विद्यार्थ्यांना स्थलांतर प्रमाणपत्र दिले जात नाही, अशा विद्यार्थ्यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर संबंधित जिल्हा शिक्षण अधिकारी (माध्यमिक) / शिक्षण निरीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी असलेल्या दाखल्याची प्राचार्यांनी साक्षांकित केलेली छायांकित प्रत ग्राहय धरली जाईल. इतर मंडळामधून खाजगीरित्या प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांचे मूळ स्थलांतर प्रमाणपत्र आवश्यक आहे.

९. राष्ट्रीय मुक्त विद्यापीठामधून (NIOS) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी कोणत्याही वर्गाची शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत सादर करावी अथवा संपर्क केंद्राने दिलेला दाखला (LC) जोडलेला असावा.

१०. QR Code प्रणालीमार्फत तयार झालेल्या चलनापेक्षा जास्तीची रक्कम भरण्यात येऊ नये.

११. DigiLocker द्वारे प्राप्त कागदपत्रे ही आय.टी. ॲक्ट 2000 नुसार Legally Valid असल्याने DigiLocker वर उपलब्ध असल्यास Documents ग्राहय धरण्यास हरकत नाही. सदर Document चा QR Code हा DigiLocker App मधील Scanner द्वारे Scan करुन त्याची वैधता पडताळणी प्राचार्यांनी करावी. (CBSE/ICSE या मंडळातून उत्तीर्ण झालेले विदयार्थी सोडून)

**१२. महत्वाचे : अन्य मंडळातून आलेल्या विद्यार्थ्यांना इ. 12 वी परीक्षेचे आवेदनपत्र भरण्यापूर्वी योग्यता प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे कनिष्ठ महाविद्यालयास बंधनकारक आहे अन्यथा परीक्षेचे आवेदनपत्र भरता येणार नाही. परंतु योग्यता प्रमाणपत्र अर्ज मंडळात सादर न करता परस्पर विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरून विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ केले जातात. सदर बाब मंडळाच्या निदर्शनास आली आहे. यापुढे अशा प्रकारची बाब निदर्शनास आल्यास संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाची मंडळ मान्यता काढून घेण्याबाबतची कारवाई करण्यात येईल व विद्यार्थ्यांची संपादणूक रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

१३. इ. 11 वी अन्य मंडळात उत्तीर्ण करून इ. 12 वी मध्ये मंडळात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकडे स्थलांतर प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाने विभागीय शिक्षण उपसंचालकांकडून मंडळ बदलाबाबतचे परवानगी पत्र योग्यता प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. तदनंतर आलेले प्रस्ताव दंडनीय दराने पात्र असतील.

१४. टी.सी., गुणपत्रक, संबधित मंडळाकडून प्राप्त ग्रेडचे गुणात रूपांतर केलेली प्रत व प्रमाणपत्र (संबंधित मंडळाकडून मूळ प्रमाणपत्र प्राप्त नसल्यास मूळ तात्पुरते प्रमाणपत्र म्हणजेच प्रोव्हिजनल सर्टिफिकेट) ची साक्षांकित प्रत (संबंधित कनिष्ठ महाविद्यालय मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी प्रमाणित केलेली असावी).

१५. शैक्षणिक खंड (गॅप) असेल तर अशा विद्यार्थ्यांच्या प्रवेशास शैक्षणिक खंडाबाबत प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे.

**१६. कोणताही पात्र विद्यार्थी योग्यता प्रमाणपत्र अर्ज भरण्यापासून वंचित राहणार नाही याची नोंद घ्यावी. जर विद्यार्थ्यांचा योग्यता प्रमाणपत्र अर्ज मंडळाने निर्धारित केलेल्या कालावधीमध्ये कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्राप्त झाला नाही अथवा पाठविण्यात आला नाही, अशी बाब या मंडळाच्या निदर्शनास आल्यास संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाची मंडळ मान्यता काढून घेण्याची कारवाई केली जाईल. योग्यता प्रमाणपत्रा अभावी विद्यार्थ्यांच्या होणा-या नुकसानीस मंडळ जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.**

उपरोक्तप्रमाणे मंडळास योग्यता प्रमाणपत्र प्रस्ताव सादर करण्याबाबतची कार्यवाही दिलेल्या मुदतीत पूर्ण करावी. सदरचे परिपत्रक मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे, याची नोंद घ्यावी .

(ज्योत्स्ना शिंदे –पवार)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४००७०३